4

# शिक्षणाची 'परीक्षा'

**प्रा. अनुराधा शाहू येडके**
अध्यक्ष, शाहु लक्ष्मी कला, क्रीडा मंडळ, पुणे
E-mail : anuradhay10@gmail.com

गेले एक–दीडवर्षं संपूर्ण जग कोरोनाच्या विळख्यात जखडले आहे. या विळख्याची पकड आत्ता सैल होईल म्हणता म्हणता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. जीवनाच्या सर्व परिभाषाच बदलल्या आहेत. लहान–थोर, गरीब–श्रीमंत, श्रेष्ठ–कनिष्ठ प्रत्येकजण जगण्यासाठी धडपड करताना दिसत आहे. ए.सी. मध्ये बसून काम करणारे नोकरदार, नोकरी सुटली म्हणून लाज न बाळगता भाज्या विकताना, रस्त्यावर वडापाव विकताना दिसत आहेत. मिळेल ते काम करून गुजराण झाली पाहिजे असा निश्चयच त्यांनी केलेला दिसतो. 'सर सलामत तो पगडी पचास' ही म्हण जगूनही दाखवावी लागेल अस त्यांना स्वप्नातही वाटलं नसेल.

सर्वांनीच परिभाषा बदलण्याचा मनोनिश्चय केला असला तरी आमचे शिक्षणक्षेत्र काही आपला हट्ट सोडायला तयार नाही. स्वतःला सिद्ध करायचं असेल तर तुम्हांला परीक्षेला पर्याय नाही हा सूर कुठेही बेसूर होताना दिसत नाही. वर्षभर मुलांच्या काळजीपोटी म्हणा किंवा शिक्षण संस्थेच्या खिशासाठी म्हणा पण निदान शिक्षण ऑनलाइन तरी आले. त्यातले शिकवणाऱ्याला आणि शिकणाऱ्याला किती झेपले हा वेगळाच मुद्दा आहे. परंतु परीक्षेच्या विळख्यात अडकलेले आमचे दहावी आणि बारावीचे विद्यार्थी बोर्डाने ऑफलाईन परीक्षा घ्यायची म्हटले की अचानक खडबडून जागे झाले आणि मग वर्षभर ऑनलाईन अभ्यास आणि वर्षाच्या शेवटी ऑफलाईन परीक्षा यामधील विरोधाभास त्यांना जाणवू लागला. थोडक्यात काय तर मी खरंच वर्षभर ऑनलाईनला नीट बसलो असतो तर ही पंचाईत आली नसती हे त्यांना आता कळलंय. असो!

सांगायचा मुद्दा असा की कोरोनाने संपूर्ण आयुष्य बदललं पण परीक्षार्थी शिक्षण आपण बदलू शकलो नाही. खरंच शिक्षणाच्या कप्प्यातून परीक्षा हद्दपार झाल्या तर शिकत असलेल्या पिढीची आणि येणाऱ्या पिढीची शिकण्याची इच्छा तर मरून जाणार नाही ना? अशी भिती वाटायला लागली आहे. समजा एक–दोन वर्षे परीक्षा झाल्याच नाही तर आपण पालक म्हणून, शिक्षक म्हणून, समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून मुलांमधील ही शिकण्याची जिज्ञासा वाढीस लावू शकू का? हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

सुरुवातीच्या काळात सर्व शिक्षण संस्थानी अगदी play group पासून पदवीपर्यंतच्या शिक्षणाला ऑनलाईन आणण्याचा प्रयत्न केला. यामध्ये कुठेही शिक्षण होताना दिसले नाही याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षक जेव्हा जीव तोडुन शिकवत होते तेव्हा टेक्नॉलॉजीचा खूप अभ्यास केलेल्या मुलांचे

अचानक नेटवर्क जायचे, आजी–आजोबांना ऑनलाईन मधले काही कळायचे नाही आणि आज काम आहे तर उद्या नाही अशी टांगती तलवार घेऊन १०–१२ तास घरात ऑनलाईन बसून काम करणाऱ्या पालकांना मुलं काय करतात हे पहायला वेळच शिल्लक नसायचा. अशाच पद्धतीने शिक्षण पद्धती पुढे जात होती. यामध्ये त्या त्या वेळी प्रत्येकजण आपापल्या जागेवर बरोबर असला तरी आतामात्र परीक्षेचा चेंडू दुसऱ्याच्या कोर्टात कसा टाकायचा याचा अतोनात प्रयत्न प्रत्येकजण करत आहे.

काल सहजच एका कार्यक्रमात कुजबूज ऐकली. एक मैत्रीण दुसरीला जग जिंकल्याच्या आविर्भावात सांगत होती, आम्ही सगळ्या पालकांनी शाळेच्या प्रशासनाला ठणकावून सांगितलं, वर्षभर मुलांनी ऑनलाईन अभ्यास केलाय मग तुम्हीही मुलांना नाराज न करता परीक्षा घ्या. परीक्षा झाल्या नाही तर ते पास कसे होणार? (आम्ही मुलगा/ मुलगी पास झाली हे कसं मिरवणार?). थोडक्यात काय तर मुलगा ऑनलाईन क्लासमध्ये झोपला जरी असला तरी तुम्ही परीक्षा या घेतल्याचं पाहिजे हा अट्टाहास. शिक्षणाचा अजब फंडा बघायला मिळाला.

आज एखादा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला तेव्हाच सिद्धता प्राप्त होते जेव्हा ती परीक्षेच्या लाटांवर विराजमान होते. परीक्षेत किती गुण मिळाले याच्यावर त्याची सामाजिक पत ठरते. शालेय जीवनात, शालेय काळ हा शिकण्याचा सुवर्ण काळ म्हणून ओळखला जातो परंतु त्याला शिकण्याच्या खरच किती संधी उपलब्ध करून दिल्या जातात हा चर्चेचा विषय आहे. विद्यार्थी दशेत मुले पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक भानही शिकत असतात. नेमका याचाच आज विसर पडताना दिसतोय. कदाचित अभ्यासक्रमात या गोष्टींना फक्त अ, ब, क, ड इतकाच दर्जा असेलही. पण मुलाची मानसिक आणि सामाजिक पत वाढण्यासाठी कोणीही विशेष प्रयत्न करताना दिसत नाही, की मोर्चे, आंदोलने होत नाहीत. जितकी पडझड मुलांच्या परीक्षा न होण्यानं होणार आहे तितकीच किंबहुना त्यापेक्षा जास्तच पडझड ही मुलांच्या समाजीकरण न होण्याने आणि मानसिकतेचे समायोजन न झाल्याने होणार आहे. परंतु या गोष्टी आता कुणाच्या गावातही नाहीत. ही जीवनमूल्ये जर योग्य वयात रुजली नाहीत तर याचे दूरगामी दुष्परिणाम हे समाजाच्या मनःपटलावर कोरले जातील. कदाचित काही वर्षांनी आपण कोरोनावर मातही करू पण आता मुलांची जी सामाजिक, मानसिक आणि शारीरिक झीज होत आहे ती भरून काढणे खरंच खूप अवघड आहे. त्यातून विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांना सगळ्यांना बाहेर पडायला दीर्घकाळ लागेल यात शंकाच नाही. म्हणूनच मुलांच्या विश्वात काम करणाऱ्या, त्यांना घडवणाऱ्या प्रत्येकाने ही परिस्थिती हाताळली पाहिजे. परिक्षांपेक्षाही हे महत्त्वाचं आहे. उद्या जर पुढे जाऊन एखादं आपलं मुलं अपयश पचवू शकलं नाही, त्याच सामाजिक, मानसिक समायोजन झालं नाही तर या परिस्थितीला त्यांच्याभोवती असणारे, त्यांच्या विश्वात वावरणारे आपण सगळे जबाबदार असू हे विसरून चालणार नाही. याचे भान ठेवूनच शिक्षण क्षेत्रातील पर्यायांचा विचार व्हायला हवा.

परीक्षांना काही पर्याय असू शकतील का? हा विचार पुढे यायला हवा. तरच शिक्षणाचा दर्जा उंचावेल. परीक्षा म्हणजे घोकंपट्टी आणि शिक्षण म्हणजे अखंड जिज्ञासा, स्वतःमध्ये पावलोपावली होणारा बदल अनुभवणे, चुकांमधून वाट काढत काढत नवनिर्मितीचा आनंद घेणे म्हणजे शिक्षण. हाच विचार करून मुलं शिक्षण घेत असतानाच

त्याच्यात होणाऱ्या बदलांच्या नोंदी केल्या, आणि एका बाजूला सकारात्मक बदलांची बेरीज वाढवत असतानाच दुसरीकडे नकारात्मक किंवा मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी बाधा आणणाऱ्या गोष्टी हळूहळू कमी केल्या तर समोर येणारे व्यक्तिमत्त्व हे शिक्षण आणि शिष्टाचार यांचा उत्तम नमुना असेल. शिक्षण परीक्षांच्या पिंजऱ्यात अडकवून ठेवण्याची गोष्ट नाही. ती एक जिवंतपणाची अनुभुती आहे.

## *नवीन साहित्य / तंत्रज्ञान*

आभासी वास्तव हे एक प्रशिक्षण तंत्र म्हणून विविध खेळ जसे गोल्फ, ॲथलेटिक्स, स्कीईंग, सायकलिंग, इ. यामध्ये वापरलं जात आहे. आभासी वास्तव याचा कार्यमान तपासण्यासाठी तसेच तंत्र / कौशल्याचे विश्लेषण करण्याकरिता वापर केला जातो. खेळाडू या तंत्रज्ञानाचा उपयोग त्यांच्या कामगिरीच्या काही पैलूंवर सूक्ष्म बदल करण्यासाठी करतो, जसे एखादा गोल्फ खेळाडू आपला स्विंग सुधारण्याचा प्रयत्न करतो किंवा ट्रॅक सायकलपटू वैयक्तिक स्पर्धेत अधिक गतिमान होण्यासाठी याचा वापर करतो. त्रिमितीय सिस्टीम खेळाडूच्या कामगिरीचे विविध पैलू दर्शवू शकतात ज्यात बदल आवश्यक आहेत, उदा. जीवयांत्रिकी किंवा कौशल्य तंत्र.



आभासी वास्तव तयार करण्याची साधने – व्हर्च्युअल रिअलिटी यंत्र. व्हर्च्युअल रिॲलिटी प्रशिक्षणात खेळाडू ३६०० सक्रिय शिक्षण वातावरणात प्रवेश करतात, दृष्टी आणि ध्वनी अनुभवतात व आभासी आणि वास्तविक वास्तविकतेमधील अडथळा विलीन करतात. हेडसेट आणि नियंत्रकांचा वापर करून, प्रशिक्षणार्थी ३डी आभासी सेटिंगमध्ये मुक्तपणे फिरतात, बोलतात आणि पाहतात, नक्कल केलेल्या वास्तविक–जगातील साधने, यंत्रसामग्री आणि इतर प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षकांशी संवाद साधतात.

संकलन : **डॉ. अमित प्रभू**